नि.फौ.ख.क्र. १५९/२०११
शासन वि. सोमनाथ व इतर

## निशाणी क्र.१ खालील आदेश

१. या न्यायालयाने आज नियमित फौजदारी खटला क्र.१५९/२०११ या प्रकरणातील अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. ६ सौ. संगिता रविंद्र स्वामी यांच्या पुराव्यापैकी सर तपास प्रथम सत्रात तर उलट तपास दुसऱ्या सत्रात नोंदविलेला आहे. त्यापैकी उलट तपास नोंदवित असताना दुपारी सव्वा तीन वाजण्याच्या सुमारास पुरावा नोंदवत असताना साक्षीदाराने आरोपींना प्रतिकूल दिलेल्या उत्तराने चिडून आरोपींचे विधिज्ञ श्री.बी.एस. शिंदे यांनी न्यायालयावर मोठया आवाजात बोलून तुम्ही एकतर्फी पुरावा नोंदवत असल्याचा चिडून आरोप केला. सदर विधीज्ञांनी कोर्टाने असा पुरावा नोंदविला पाहिजे, हे असे नोंदविता येत नाही, आमच्या मनाने देखील काही नोंदविले पाहिजे असे त्वेषाने व अत्यंत मोठया आवाजाने ओरडून तसेच न्यायालयास हातवारे करून न्यायालयावर एकतर्फी पुरावा नोंदवत असल्याचा आरोप केला. तसेच त्यांनी पुरावा नोंदविताना वेळोवेळी न्यायालयास डिक्टेट देखील केलेले आहे. त्यावेळी त्यांचे वर्तन अतिशय रुढपणाचे तसेच एका विधिज्ञाने न्यायालयाशी व्यवहार करताना अतिशय असाजेसे असे होते. सदर विधीज्ञांनी यातील उपरोक्त नमुद साक्षीदार यांना देखील जोरजोराने व दबाव टाकून ओरडून त्यांच्या मनाप्रमाणे साक्षीदाराच्या तोंडातून वदवून घेत होते. सदर विधीज्ञांना साक्षीदार ही अशिक्षित वजा खेडवळ महिला आहे, त्यांना अशा मोठया आवाजाने व त्वेषाने विचारुन दबाव टाकू नका, सौम्य भाषेत विचारा असे वारंवार सांगितले असता त्यांनी चिडून जाऊन न्यायालयावर आरोप करुन दबाव टाकण्याचा वारंवार प्रयत्न केला.

२. याच प्रकरणात यापूर्वीच्या नोंदविलेल्या दोन साक्षीदारांच्या वेळी देखील सदर विधीज्ञांनी साक्षीदारांवर, सरकारी वकीलांवर तसेच न्यायालयावर या ना त्या प्रकारे दबाव टाकून त्यांच्या मनाप्रमाणे रेकॉर्डीग करण्याचा अट्टहास केलेला आहे.

३. आणखी म्हणजेच सदर विधीज्ञ महोदयांनी न्यायालयाने प्रथम सत्रात नोंदविलेल्या सर तपासाची मूळ प्रत उलट तपासासाठी विनंती करुन घेतली होती. सदर सर तपासाच्या पाठीमागे उलट तपासाची प्रत काढण्याची होती. सदर सर तपास हा न्यायालयाचे मूळ दस्त आहे. तो दस्त त्यांनी खुल्या न्यायालयातून विना परवानगी घेऊन गेले. त्यावेळी या न्यायालयात विधीज्ञ मंडळी जसे की, सरकारी वकील श्रीमती कप्पीकेरे मॅडम, श्री. भोसले, श्री. बोळे, श्री. पी.एम. सूर्यवंशी, श्री. काळेगोरे, श्री. एम.एन. बिरादार, श्री.

निलेवाड, श्री. आर.जे. पटेल, सौ. स्वप्ना बिरादार मॅडम आणि दिपाली सोमवंशी मॅडम इ. हजर होते. त्यांनी प्रस्तुत प्रकार पाहिलेला आहे. सदर वकील मंडळी बराच वेळ न्यायालयात बसून होते. ते न्यायालयात बसलेले असेपर्यंत श्री. शिंदे यांनी प्रस्तुत मूळ दस्त परत आणून दिलेला नाही. सदर बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे. त्याबाबत त्यांना कारणे दाखवा नोटीस देखील काढण्यात आलेली आहे. सदर प्रकार गंभीर व एका विधीज्ञास अशोभनिय असा आहे. असे प्रकार टाळण्याचे त्यांना गेल्या वर्षभरापासून विनंती वजा सुचित करण्यात आलेले असताना देखील ते प्रत्येक प्रकरणात दंडेलशाहीने वागून न्यायालयावर दबाव टाकण्याचा प्रयत्न करतात. सबब, त्यांचे प्रस्तुत वर्तन अभिलेखावर घेण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BHALCHANDRA RAWSAHEB ZENDE
Date: 2025.02.11 18:45:24 +0530

(भालचंद्र रा. झेंडे)

दिनांक : ११.०२.२०२५

४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी ,
उदगीर.